ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 11 | Dec - 2015

ISRJ Indian Streams Research Journal

# मुघल काळत मराठी सत्तेचे खानदेशाशी असलेले संबंध

डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर
इतिहास विभाग , राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय पारोळा जि. जळगांव.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील 'खानदेश' या प्रदेशाला मोठी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. मि. सिल्लर हे इतिहास संशोधक 'खानेदश म्हणजे मुळ कान्हदेश, यादवांचा राजा श्री कृष्ण ह्यांचा देश' असे ते मानतात. कान्हदेश या शब्दाचा अपभ्रंश 'खानदेश' असा झाला असे सुचवितात. त्याचप्रमाणे अबुल फझलच्या ऐनेअकबरी प्रमाणे 'खानदेश' म्हणजे खानाचा देश अशी उपपत्ती आहे. 'खान' ही पदवी गुजरातचा पहिला अहमद या राजाने इ.स. १४१७ मध्ये खानदेशचा फरूकी राजा मलिक नासिर या दुसऱ्या मुलास बहाल केली.



एकुणच दुसऱ्या व्याख्याप्रमाणे फेरिस्ताने ही आपल्या वर्णनात खानेदशचा उल्लेख केलेला आहे. यावनी सत्तेच्या नियंत्रणासाठी हा मुलूख बराच काळ होता. खानदेशावर इ.स. १३१२ पर्यंत यादवांचे राज्य होते. इ.स. १३२३ पासून मात्र मुसलमान सत्ताधिंशाच्या ताब्यात खानदेश गेला. महंमद तुघलक नंतर फारूकी राजांची सत्ता स्थापन झाली. मोगल बादशाह च्या कारकिर्दीत खानदेशात प्रचंड दुष्काळ पडला होता. इ.स. १६३४ मध्ये खानदेशचा सुभा बनविण्यात आला. इ.स. १६३४ मध्ये खानदेशचा सुभा मोगल बादशाह औरंगजेबाच्या ताब्यात दिला गेला.

**मराठा मोगल संबंध :-**

छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याचे कार्य हाती घेतल्यानंतर साम्राज्य विस्तार आणि स्वराज्याच्या निर्मीतीचे कार्य हाती घेतले. स्वराज्य स्थापनेचे हेतु सफल करताना त्यांना मोगल, आदीलशाही, निजामशाही या सत्तांशी सत्ता संघर्ष करावा लागला. यावनी सत्तेने मराठी स्वराज्याचे केलेले आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्याचप्रमाणे प्रचंड मोगल सत्तेशी सोबतच सागरावर वर्चस्व असलेल्या इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच या सत्ताधिंशांना नमविण्यासाठी स्वतंत्र आरमार, नाविक दल आणि प्रचंड साधन सामुग्रीची गरज होती. या शत्रूंना नमविण्यासाठी सर्वसामान्य जनतेवर करांचे ओझे न टाकता मराठी मुलुखाची धुरधान करणाऱ्या यावनी सत्तांना धडा शिकविण्यासाठी त्यांचा सधन - संपन्न प्रदेश लुटून आणायचा असे शिवाजी राजांचे धोरण होते. या मिळालेल्या संपत्तीचा विनियोग स्वराज्यकामी ते करीत असत.

छत्रपती शिवाजी महाराजांचा खानदेशाशी प्रथम संबंध आग्रा भेटीला जातांना आला. शिवाजी महाराजांना आग्रा भेटीला पुरंदरच्या तहानुसार जावे लागले होते. मिर्झा राजा जयसिंहाने त्यांच्या जिवीताची पुर्ण हमी घेतली होती. राजे राजगडावरून औरंगाबाद मार्गे खानदेशातुन बऱ्हाणपुरला ५ मार्च १६६६ रोजी जाऊन पोहचले. छपत्रती शिवरायांचा खानदेशाला झालेला हा पहिला पदस्पर्श होय. त्यांच्या सोबत राजपुत्र संभाजी राज्यांचाही पहिला पदस्पर्श खानदेशच्या भुमीला झाला.

छत्रपती शिवरायांचा इ.स. १६६६ मध्ये केवळ या मार्गाने जात असतांना संबंध आला. परंतु साम्राज्य विस्तार विषयक व मोगल सत्तेशी सत्तासंघर्षाच्या निमीत्ताने पहिला संबंध इ.स. १६७० मध्ये आला. शिवरायांनी सुरतेची दुसरी लुट केल्यानंतर ते खानदेशातुनच दक्षिणकडे गेले. शिवाजी राजे आग्राच्या नजरकैदेतुन शिताफीने निसटले. औरगजेब आणि शिवाजी राजे यांच्या त्यानंतर एक तह झाला. या तहानुसार केवळ काही काळ औरंगजेब शांत राहीला. परंतु त्याने मराठी आपल्या आक्रमक हालचाली पुन्हा सुरू केल्या. त्याने मराठी मुलूखावर आक्रमण करण्यास सुरूवात केली. त्याचप्रमाणे पुरंदरच्या तहाने राजांनी मराठी मुलूखांचा बराचसा प्रदेश गमविला होता. तो परत मिळविण्यासाठी आणि औरंगजेबला रोखण्यासाठी राजांनी मुघलांकडे आपले लक्ष केंद्रीत केले. त्यातुनच खानदेशाशी संबंध आला.

### शिवाजी राज्यांच्या आक्रमक कारवाया :-

मोगल बादशहा आक्रमक धोरण हाती घेत आहे हे कळताच शिवाजी राज्यांनी त्यांच्या आधी म्हणजे फेब्रुवारी १६७० मध्ये बऱ्हाणपुर जवळील बहादुरपुरा शहरावर जोरदार आक्रमण केले. त्याठिकाणी त्यांच्या हाती प्रचंड संपत्ती लागली. प्रतापराव गुजरने वऱ्हाडातील अतिशय संपन्न, समृध्द असलेल्या कारंजा गावावर आक्रमण केले. शिवाजी महाराज्यांनी आपल्या सैन्यासह वऱ्हाड भागावर जोरदार आक्रमण केले. त्यानंतर मोरेपंत पिंगळेने बागलाणमधील 'साल्हेर' या महत्वपुर्ण किल्ला जिंकला. इ. स. १६७२ मध्ये मुहाबतखान या मोगल सरदाराने प्रचंड सैन्यासह साल्हेरच्या किल्ल्याला वेढा दिला. मोगलांना यावेळी माघार घ्यावी लागली.

इ.स. १६७४ मध्ये छत्रपती शिवरायांचा राज्यभिषेक सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. या प्रसंगातून आखिल जगताला स्वराज्य हिंदवी स्वराज्याचे 'छत्रपती शिवाजी राजे' धर्मनिष्ठ, कायदेनिष्ठ राजपदावर आरूढ झाल्याची वार्ता समजली. मात्र या घटनेने आलमगिर औरंगजेब बादशहाचा नुसता जळफळात झाला. त्याने बहादुरखानास शिवाजी विरूध्द कारवाई करण्यास सांगीतले. परंतु त्यांच्या आधिच राज्यांनी जोरदार चढाई केली. त्यानंतर राजे बागलाणातुन खानदेशाकडे आले. मराठी सेनेने १ जानेवारी १६७५ रोजी समृध्द, संपन्न असलेले धरणगांव शहर आणि त्याठिकाणची इंग्रजांची वखार लुटली. धरणगांव वखारीचा इंग्रज अधिकारी सॅम्युअल ऑस्टिन याला मराठ्यांनी कैद केले.

शिवाजी महाराजांनी धरणगांव नंतर आपल्या सैन्यास चोपड्याकडे कूच करायला सांगीतले. धरणगांव व चोपडा परिसरातुन राज्यांना प्रचंड संपत्ती प्राप्त झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगल सत्तेच्या विरोधात उभारलेला हा लढा छत्रपती संभाजींच्या ही काळात सुरू होता. इ.स. १६८० मध्ये संभाजीने मुघलावर आपली फौज रवाना केली. सर सेनापती हंबीरराव मोहीतेने धरणगांव लुटून बऱ्हाणपुरवर आक्रमण केले. बऱ्हाणपुरमध्ये हंबीरराव सतत तीन दिवस तळ ठोकुन होते. त्यांना बऱ्हाणपुर मधुन लाखोची लुट मिळाली. त्यानंतर हंबीरराव आपल्या सैन्यासह चोपडा, एरंडोल मार्गे साल्हेरला गेले. बऱ्हाणपुरच्या या लुटीत मुघलांची प्रचंड संपत्ती तर गेलीच सोबतच मोगल सत्तेची या घटनेने प्रचंड नाचक्की झाली. धरणगांव ही संपन्न - समृध्द व्यापारी वखार व बाजारपेठ असल्यामुळे मराठ्यांनी या वखारीवर अनेकवेळा चढाई करून संपत्ती मिळविली. संभाजीने इ.स. १६८५ मध्ये आपल्या सैन्याला पुन्हा धरणगांववर चढाई करण्यास पाठविले यावेळी जवळपास १/४ धरणगांव हे गांव जळून खाक झाले. मराठ्यांनी खानदेशातील जळगांव, नंदूरबार , सुलतानपुर, बऱ्हाणपुर, दहेजगांव, रावेर या गावावर चढाया केल्या. काही गावावर तर दोन - तीन वेळेस यशस्वी मार्गक्रमण केले. मोगली सत्तेला नामोहरम करण्यासाठी खानदेश सारखा अतिशय संपन्न व समृध्द असलेला प्रदेश मराठ्यांचा लक्ष ठरला. मराठ्यांच्या खानदेशातील साऱ्यामुळे मोगल पार जेरीस आलेले होते. मुघल बादशाह शाहजहान पासून औरंगजेबा पर्यंत कमी - अधिक प्रमाणात साऱ्याच मोगल बादशहाच्या काळात मराठ्यांनी आक्रमक चढाई केल्या.

### पेशवे आणि खानदेशचा संबंध :-

छत्रपती शाहुंची मुगलांनी सटका केल्यानंतर मराठ्यांना चौघाई आणि सरदेशमुखीचे अधिकार बहाल केलेले होते. या अधिकार क्षेत्रात खानदेशचा समावेश होता. इ.स. १७५२ ला झालेल्या भालकीच्या तहानुसार मराठ्यांना खानदेशचा बराच भाग निजामाकडून मिळाला. त्यानंतर मराठ्यांनी इ.स. १७६० मध्ये संपुर्ण खानदेश मिळविला. पेशवा रघुनाथराव उत्तरेकडे पळून जात असतांना तो खानदेशातुन मार्गस्थ झाला होता. रघुनाथरावांचा बिमोड करण्यासाठी हरिपंत फडके एदलाबाद जवळ तळ ठोकुन बसलेला होता. इ.स. १७६३ मध्ये निजामाने माधवराव पेशवाला खानदेशातील सावदा ही दिलेली जाहगिरी त्यांनी आपले मामा रास्ते यांना दिलेली होती. ती जहांगिरी ब्रिटीश सत्ता येईपर्यंत म्हणजे १८१८ पर्यंत टिकुन होती. मराठेशाहीच्या ऱ्हासापर्यंत खानदेशातील बराचसा भाग होळकरांकडे होता. २१ डिसेंबर १७१८ मध्ये होळकरांचा आणि मराठी सैन्याचा ब्रिटीश सेनेने निर्णयक पराभव केला. त्यानंतर झालेल्या तहानुसार खानदेशचा संपुर्ण प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. इ.स. १८१८ मध्ये उर्वरीत खानदेश इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतला.

### सारांश :-

खानदेश हा अतिशय सुपिक, संपन्न प्रदेश होता. १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत खानदेश भरभराटीच्या उच्च स्थानी होता. खानदेशात ज्वारी, कापूस, व भात ही पिके घेतली जात. नवापुर, नंदुरबार याठिकाणचा तांदुळ प्रसिध्द होता. एरंडोल येथील 'आंबे' विशेष प्रसिध्द होते. एकंदरीत संपुर्ण प्रदेश हा संमृध्द होता. सुरत व आगऱ्याकडे जाण्याचे मार्ग बऱ्हाणपुरहुन होते. उत्तरेत तसेच दक्षिणेस जातांना खानदेश मध्यवर्ती ठिकाण होते. अशा संपन्न, समृध्द आणि व्यापाराच्या तसेच राजकिय दृष्टिने साऱ्याच सत्तांचे या प्रदेशाकडे लक्ष गेले. काळानुरूप येथील सत्तेची सुत्र बदतल गेली. परिणामस्वरूप विविध सत्ताधिशांच्या आक्रमक कारवायांचे हे लक्ष्य ठरल्याने मात्र या प्रदेशाला नेहमीच लष्करी कारवायांना सामोरे जावे लागले. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांपासून थेट छत्रपती शाहू पर्यंत नव्हे पेशवाईच्या अस्तापर्यंत खानदेशाच्या सत्तेचा लपंडाव सुरूच होता.

### संदर्भ :-

१) भनसाळी डी. एम. - संयुक्त खानदेश डिरेक्टरी
२) चौधरी कि. का. - महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, जळगांव जिल्हा

३) महाजन टि. टी. - खानदेश अंडर दि मुघल्स् गॅलक्सी पब्लिकेशन, दिल्ली
४) भट द. स. - धुळे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभुमी (संशोधक)